# इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे २०१५-१६

## प्रसिद्धी निवेदन

दिनांक :- १९/८/२०१५

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सन २०१५-१६ साठी सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे इ. ११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत पाच फे-यांद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले आहेत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार सर्व विद्यार्थी व पालकांना कळविण्यात येते की, ५ व्या फेरीनंतर गैरसोय झालेल्या तसेच जे विद्यार्थी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाले नव्हते. अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी गरवारे कॉलेज येथे अर्ज मागविण्यात आले होते. अशा विद्यार्थ्यांसाठी दिनांक २०/८/२०१५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंतच अर्ज स्विकारले जातील.

या सर्व विद्यार्थ्यांना रिक्त जागांवर गुणवत्तेनसार एमकेसीएल मार्फत ऑनलाईन पध्दतीने समुपदेशन करुन त्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी इयत्ता ११ वी प्रवेशाची ६ वी फेरी घेण्यात येत आहे. या फेरीत आतापर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी अदयाप अर्ज केलेले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांनी उदया दिनांक २०/८/२०१५ रोजी स्थळः आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे येथे सायं. ५.०० पर्यंत अर्ज सादर करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. अर्ज सादर करण्याचा हा शेवटचा दिवस असून ज्यांनी यापूर्वी अर्ज सादर केलेला आहे त्यांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑफ-लाईन ने प्रवेश देवून नयेत, ज्यांनी प्रवेश दिले असतील ते अवैध ठरवून रद्द केले जातील आणी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद यावी. प्रवेशाबाबतच्या ६ व्या फेरी चे नियोजन लवकरच जाहिर करण्यात येत आहे.

(रामचंद्र जाधव)
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती, पुणे
तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १